# ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

## प्रेस नोट दि.१४.०२.२०१९

---

**तक्रारदार यांना शासनमान्य घरकुल प्रतिक्षा यादीतील नंबर वर आणण्यासाठी मदत व त्यासाठी आवश्यक उतारा देण्यासाठी, श्री.दिनमहम्मद शेखनूर मुलाणी, वय ७२ वर्षे, ग्रामपंचायत सदस्य साडे, मुळ रा.साडे ता.करमाळा जि.सोलापुर यांना २,०००/- रूपये लाच स्विकारल्यानंतर रंगेहात पकडले.**

---

यातील तक्रारदार यांनी त्यांचे मुलाचे नावे साडे गावात गरीबांसाठी घरकुल शासनमान्य योजनेतुन घर मिळणेबाबत अर्ज सादर केला आहे, परंतू त्या योजनेच्या प्रतिक्षा यादीमधे त्यांचा नंबर खुप खाली आहे, तो प्रतिक्षा यादीतील नंबर वर आणण्यास मदत करण्यासाठी व त्या करीता आवश्यक तो उतारा मिळवुन देण्यास मदत करण्यासाठी श्री.दिनमहम्मद शेखनूर मुलाणी, वय ७२ वर्षे, ग्रामपंचायत सदस्य साडे यांनी २,०००/- रूपये लाचेची मागणी केली होती. त्यावरून त्यांनी दि.१३.०२.२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरोच्या कार्यालयात तक्रार नोंदवली होती.

त्यावरून दि.१३.०२.२०१९ रोजी तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी साडे ता.करमाळा येथे जावुन केली असता त्यामध्ये ग्रामपंचायत सदस्य श्री.मुलाणी यांनी प्रतिक्षा यादीतील नंबर वर आणण्यास मदत करण्यासाठी व त्या करीता आवश्यक तो उतारा मिळवुन देण्यास मदत करण्यासाठी २,०००/-रु.लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरून ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर यांनी श्री.मुलाणी यांचे साडे येथील चिकन सेंटरचे दुकाना जवळ लाचेचा सापळा आयोजीत केला. त्यामध्ये श्री.दिनमहम्मद शेखनूर मुलाणी, वय ७२ वर्षे, ग्रामपंचायत सदस्य साडे यांनी लाचेची रक्कम त्यांचे चिकन सेंटरमधे २,०००/- रूपये स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री.संदीप दिवाण, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्री.दिलीप बोरस्ते, अपर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री.अरूण देवकर, पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर, श्रीमती कविता मुसळे, पोलीस निरीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापुर व सापळा पथकाने यशस्वी रित्या पार पाडली आहे.

तरी याद्वारे ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर कडून सोलापूर जिल्हयातील जनतेस अवाहन करण्यात येत की, कोणी लोकसेवक त्यांचे पदीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर, फोन क्रमांक ०२१७-२३१२६६८, टोल फ्री क्रमांक १०६४ वर संपर्क साधावा.

(अरूण देवकर)
सहा.पो.आयुक्त/पो.उप अधिक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर

Scanned with CamScanner